follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३३७ शुक्रवार दि.६ सप्टेंबर २०२४ पाने ४ किंमत ५/-

देवस्थानांच्या विकासासाठी २७५ कोटी

बीड, जालना, नागपूर अन् कोल्हापूरमध्ये सुशोभीकरण

मुंबई : श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील ८ देवस्थानांच्या सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या विकास आराखड्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला आहे. राज्यातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र, देवस्थान विकास शिखर समितीची बैठक आज मंत्रालयात पार पडली. बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंर्त्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, यंदाचे वर्ष हे श्री चक्रधर स्वामींचे अष्टशताब्दी जन्मोत्सव वर्ष आहे. तसेच आज त्यांची जयंती आहे, यानिमित्ताने महानुभाव पंथाच्या देवस्थानांच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. भक्तीधाम प्रल्हादपूर येथील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्र विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, यासाठी दोन टप्प्यात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच संत सावता माळी यांचे गाव असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील अरण या गावाला अ वर्ग तीर्थक्षेत्र जाहीर करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीत ग्रामविकास विभागाच्या अमरावती जिल्ह्यातील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यासाठी २५ कोटी, रिद्धपूर तीर्थक्षेत्रासाठी १४.९९ कोटी, बीड जिल्ह्यातील श्री पांचाळेश्वर तीर्थक्षेत्रासाठी ७ कोटी ९० लाख, श्री क्षेत्र पोहीचा देव तीर्थक्षेत्रासाठी ४ कोटी ५४ लाख, जालना जिल्ह्यातील जाळीचा देव तीर्थक्षेत्रासाठी २३ कोटी ९९ लाखाच्या वर्धा जिल्ह्यातील श्री गोविंद प्रभू देवस्थानासाठी १८ कोटी ९७ हजाराच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली. तसेच पर्यटन विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथील श्री विठ्ठल मंदिर देवस्थानाच्या विकासासाठी १६४.६२ कोटींच्या आणि कोल्हापूर

जिल्ह्यातील वडणगे येथील शिव पार्वती तलावाच्या सुशोभीकरणासाठी १४ कोटी ९७ लाखाच्या निधीला मंजूरी देण्यात आली.

फडणवीसांनीही व्यक्त केला आनंद

राज्य सरकारच्यावतीने भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींना अनोखे नमन करण्यासाठी मला हे सांगताना आनंद होतो की, त्यांच्या जीवनकार्याशी संबंधित तसेच महानुभाव पंथाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या एकूण ५ देवस्थानांच्या विकास आराखड्यांना आज मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि माझ्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी प्रदान करण्यात आली. हे पाचही मिळून एकूण ७८ कोटी रुपयांचे आराखडे आहेत, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे

श्री क्षेत्र रिद्धपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती (२५ कोटी मंजूर)
श्री क्षेत्र पांचाळेश्वर ता. गेवराई, जिल्हा बीड (७.९० कोटी मंजूर)
श्री क्षेत्र पोहीचा देव, कोळवाडी, ता. जि. बीड (४.५४ कोटी मंजूर)
श्री जाळीचा देव, ता. भोकरधन, जिल्हा जालना (२३.९९ कोटी)
श्री गोविंद प्रभू देवस्थान, भिष्णूर, ता. आष्टी, जिल्हा वर्धा (१८ कोटी)

महाराष्ट्रात येणार तिसरी आघाडी

मनोज जरांगे सोबत येणार का? संभाजीराजेंनी दिले मोठे संकेत

पुणे : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडीप्रमाणे तिसरी आघाडीची जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच स्वराज्य पक्ष प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी पुण्यात बैठक घेतली. या बैठकीमध्ये बच्चू कडू यांच्यासह वंचित आघाडींना एकत्र घेऊन पर्याय देण्याचा विचार सुरू असल्याची माहिती संभाजीराजेंनी दिली. पण, या बैठकीला बच्चू कडू हे गैरहजर होते. तसंच, मनोज जरांगेंशी चर्चा सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलं.

आगामी विधानसभा निवडणुकांकरिता राज्यात नवी आघाडी स्थापन करण्याबाबत स्वराज्य पक्ष प्रमुख छत्रपती संभाजीराजे, प्रहार पक्ष प्रमुख आमदार बच्चू कडू आणि विविध पक्षांच्या प्रमुख पदाधिकारी राज्यात ठिकठिकाणी बैठक घेत आहेत. मुंबईनंतर आज पुण्यात बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर संभाजीराजेंनी पत्रकार परिषद घेऊन पत्रकारांशी संवाद साधला.

'७५ वर्ष फक्त हेवेदावे करण्यात आले. याच्या पलीकडे आपण गेलोच नाही. आम्ही एक वेगळा पर्याय ज्या पर्यायाचा माध्यमातून खऱ्या अर्थाने सुसंस्कृत महाराष्ट्र घडवण्याच्या दृष्टिकोनातून आमचा प्रवास सुरू झाला. आजच्या बैठकीत बच्चू कडू येणार होते पण कोर्टात तारीख असल्याने ते आज आले नाही. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू देखील आले आहे. आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू फुले आंबेडकर यांचे विचार पुढे घेऊन जाणार आहे. राजू शेट्टी यांच्याशी देखील बोलणं सुरू आहे. एक वेगळा पर्याय कसा देऊ शकतो यावर आमची चर्चा झाली आहे,' अशी माहिती संभाजीराजेंनी दिली.

'पडायचं नाही तर निवडून आणायचं'

'मनोज जरांगे पाटील यांच्याशी देखील बोलणं सुरू आहे. पडायचं नाही तर निवडून आणायचं आहे. ओबीसी नेत्यांशी सुद्धा या संदर्भात आमची चर्चा सुरू आहे. आज कुठल्याही मुद्द्यांवर चर्चा झालेली नाही. जनता व्यथित झालेली आहे. जरांगे यांना विनंती केली आहे, पाडायचे नाही तर जिंकायचं कसं यावर आपण बोलू,' असंही संभाजीराजे म्हणाले.

'मराठा आरक्षणाबद्दल सर्वपक्षीय नेत्यांनी स्पष्टता द्यावी'

'मनोज जरांगे यांनी काही मागण्या केल्या आहेत. आमच्या मागण्या जवळपास सारख्या आहेत. सरकारनं दिलेलं आरक्षण टिकणार आहे का यावर कोणी बोलत नाही. युती किंवा महाविकास आघाडी यांनी मला तिथे बैठक बोलवून मला बोलवावं. शरद पवार, उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस, कॉंग्रेस नेत्यांनी मराठा आरक्षणाबद्दल स्पष्टता द्यावी,' अशी मागणीही संभाजीराजेंनी केली.

'माझं आणि जरांगे आमचं जमतंय. सामाजिक मागास आणि शैक्षणिक मागास म्हणजे एक. गरीब समाजाला न्याय मिळाला पाहिजे,' असंही संभाजीराजे म्हणाले.

'जोडे मारो आंदोलन महाराष्ट्राची संस्कृती आहे का?'

'राजकोट किल्ल्याबाहेर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडला हे राज्यासाठी दुर्दैवी. जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. कला संचानालयाने परवानगी दिली का? याचे स्पष्टीकरण सरकारने दिले पाहिजे. या पुतळ्या संदर्भात १२ तारखेला मी पंतप्रधान मोदींना पत्र दिलेले आहे. पण आघाडी मधल्या नेत्यांनी माझं पत्र का नाही वाचलं? राजकोट किल्ल्यावर युती, आघाडीमध्ये हमरीतुमरी झाली तिथे काही झालं असतं तर राज्याला पटलं असतं का? जोडे मारो आंदोलन महाराष्ट्राची संस्कृती आहे का? मोठ्या नेत्यांनी हे आंदोलन केलं. राज्यातील सगळे नेते मोठे आहेत त्यांनी सुद्धा कामं केली ना?' असा संतप्त सवालही संभाजीराजेंनी उपस्थितीत केला.

''माफी तोच मागतो, जो चुकीचे काम करतो''

राहुल गांधींचे पंतप्रधान मोदींवर टीकास्त्र

सांगली : काही दिवसांपूर्वी मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. या दुर्घटनेवरून आता विरोधी पक्षनेते तथा कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. जो चुकीचं काम करतो, तोच माफी मागतो, असं म्हणत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींना लक्ष्य केलं. पतंगराव कदम यांच्या पुर्णाकृती पुतळा अनावरण कार्यक्रमात ते बोलत होते.

नेमकं काय म्हणाले राहुल गांधी : यावेळी बोलत असताना राहुल गांधी म्हणाले, ''आज आपण पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचं अनावरण केलं. त्यावेळी मी विचार करत होतो की, कदमजींनी ६० वर्षे आपल्यासोबत काम केलं. त्यांनी प्रामाणिकपणे काम केलं. त्यांनी ६० वर्षात कधीही माफी मागितली नाही. का मागितली नाही, कारण गरज पडली नाही. हेच सत्य आहे. माफी तोच मागतो, जो चुकीचं काम करतो'', असं म्हणत राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींना लक्ष्य केलंय.

महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाची माफी मागावी : गांधी पुढं म्हणाले, ''काही दिवसांपूर्वी मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची घटना घडली. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मी शिवाजी महाराजांची माफी मागतो. मात्र, त्यांनी माफी मागण्याची वेगवेगळी कारणं असू शकतात. उदाहरणार्थ, या पुतळ्याचं कंत्राट राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील कोणाला तरी देण्यात आलं असेल. त्यामुळं त्यांना वाटत असेल की त्यांनी हे कंत्राट गुणवत्तेवर द्यायला हवं होतं.'' तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. त्यामुळं त्यांनी फक्त केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचीच नाही तर महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाची माफी मागितली पाहिजे, असंही ते म्हणाले.

शासनमान्य अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी अनुदानासाठी १५ सप्टेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई : अल्पसंख्याक विकास विभागामार्फत ''धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित विना अनुदानित कायम विना अनुदानित, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना – सन २०२४-२५'' राबविण्यात येत आहे.

इच्छुक शाळांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १५ सप्टेंबर, २०२४ आहे. यानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सन २०२४-२५ या वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, अपंग शाळा, नगरपालिका नगरपरिषद शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी विहित अटी व शर्तीची पूर्तता करुन सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता विहित नमुन्यातील अर्जासह परिपूर्ण प्रस्ताव, जिल्हाधिकारी, मुंबई शहर, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांचेकडे सादर करावा. योजनेबाबतचा अधिक तपशील महाराष्ट्र शासनाच्या https://mdd.maharashtra.gov.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

इच्छुक शाळांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १५ सप्टेंबर, २०२४ आहे.

यानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी कार्यालयाने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून त्रुटींची पुर्तता करून अंतिमरित्या पात्र प्रस्ताव शासनास प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ पर्यत राहील. अशी माहिती मुंबई शहरचे जिल्हा नियोजन अधिकारी जी.बी.सुपेकर यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

मालेगावच्या कृषी विज्ञान संकुलास छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

मुंबई : नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील काष्टी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या कृषी विज्ञान संकुलास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी काष्टी ता.मालेगाव येथील कृषी विज्ञान संकुलास छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात यावे अशी विनंती मुख्यमंत्री श्री. शिंदे, तसेच कृषिमंत्री श्री.मुंडे यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. मंत्री श्री. भुसे यांच्या विनंतीनुसार सदर कृषी विज्ञान संकुलास छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात यावे, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कृषी विभागास केल्या होत्या.

त्यानुसार कृषिमंत्री श्री.मुंडे यांनी तात्काळ निर्णय घेत काष्टी येथील 'कृषी विज्ञान संकुलाचे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुल, काष्टी ता.मालेगाव जि.नाशिक' असे करण्याचा निर्णय घेतला आहे. या संकुलात दरवर्षी सुमारे ३२० विद्यार्थी प्रवेश घेतात तर साधारण चार वर्षामध्ये बाराशे पेक्षा जास्त विद्यार्थी येथे शिक्षण घेत असतात. उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, तसेच त्याचा समाजातील शेतकरी योग्य प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीने हे कृषी विज्ञान संकुल अत्यंत उपयुक्त असून आता छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव या कृषी विज्ञान संकुलास दिल्याने आनंद व्यक्त केला जात आहे.

राहुल गांधी यांच्या दौऱ्यात उद्धव ठाकरे अनुपस्थित: राजकीय चर्चांना उधाण

मुंबई: लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या सांगली दौऱ्यात महाविकास आघाडीतील कॉंग्रेसचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे मात्र अनुपस्थित होते. मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करण्याच्या मागणीला कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसने वाटाण्याच्या अक्षता लावल्यामुळे ठाकरे नाराज असल्याची आणि त्यामुळे ते दौऱ्यात अनुपस्थित असल्याची चर्चा रंगू लागली आहे. मात्र, पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे सांगलीच्या कार्यक्रमात ठाकरे उपस्थित नसल्याचे शिवसेना ठाकरे गटाकडून सांगण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असलेल्या राहुल गांधी यांनी नांदेड येथे कॉंग्रेसचे दिवंगत आमदार वसंत चव्हाण यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर वांगी येथे त्यांच्या हस्ते दिवंगत नेते पतंगराव कदम यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख नेते उपस्थित होते. उद्धव ठाकरे मात्र या कार्यक्रमाला उपस्थित नव्हते. त्यांच्या अनुपस्थितीमुळे त्यांच्या नाराजीबद्दलच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागल्या आहेत. मात्र, पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे ते कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत, असे स्पष्टीकरण ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दिले आहे.

विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना महाविकास आघाडीने मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करावा, अशी मागणी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत दीर्घकाळपासून करीत आहेत. लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी आदित्य ठाकरे यांनी संजय राऊत यांच्यासह दिल्लीचा दौरा करून कॉंग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांची भेट घेतली. या दौऱ्यानंतर उद्धव ठाकरे हेच महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा असतील, अशी वृत्त देखील प्रसिद्ध झाली.

गणेशोत्सवादरम्यान कोकणात जाणाऱ्या मार्गावर जड वाहतूक बंद

मुंबई : गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने भाविक कोकणात जातात, या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या मार्गावर वाहतूक सुरळीत राहण्यासाठी जड वाहतूक बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) रविंद्र चव्हाण यांनी आज या संदर्भात मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

मंत्री श्री. चव्हाण म्हणाले की, गणपतीसाठी मोठ्या संख्येने कोकणवासी आपल्या गावाकडे जातात, त्यामुळे या काळात या मार्गावर वाहतुकीचे प्रमाण अधिक असते, हे लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने या ठिकाणी पर्यायी मार्गाचे काम करण्यात आले आहे, जेणेकरुन पर्यायी मार्गावरुन ही वाढीव वाहतूक सहजतेने ये-जा करु शकेल. तसेच या काळात कोकणात जाणाऱ्या गाड्यांसाठी गणेशोत्सवानिमित्त दि. १९ सप्टेंबर पर्यंत टोलमाफी करण्यात आल्याची माहिती यावेळी दिली. मुंबई गोवा महामार्गाचे काम बीओटी तत्वावर असून या महामार्गावरील १४ ठिकाणी पुलांचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यामुळे या ठिकाणी सर्व्हीस रोडचा वापर करण्यात अडचण येत असल्याने या ठिकाणी रहदारीची समस्या निर्माण होते, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या महामार्गावरिल प्रलंबित कामे सुव्यवस्थितरित्या गतीने पूर्ण केली जावी, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी पाहणी करुन त्याबाबत नियंत्रण ठेवल्या जात आहे. या ठिकाणी पुलाचे काम प्रलंबित असल्याने प्रामुख्याने अ.डचण होत असल्याचे सांगून मंत्री श्री. चव्हाण यांनी सुरळितरित्या वाहतूक करणे शक्य होण्यासाठी कंत्राटदारांनी दर्जेदार काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

गणेशोत्सवानिमित्त गणपती आरती ॲपची निर्मिती

गणेशोत्सवात सर्वत्र भक्तीमय उल्हासाचे वातावरण असते, या निमित्ताने विविध आरती एकत्रितपणे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने ॲप सुरु करण्यात येत असून ेिरींळपवीलहर्रीरप.ले या युआरएलवर सर्व आरतीचे व्हीडीओ, ऑडीओ उपलब्ध करुन देण्यात येत असल्याची माहिती ही मंत्री श्री. चव्हाण यांनी यावेळी दिली.

गणेशोत्सवात कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रात सर्वत्र गणपतीचे आगमन मोठ्या जल्लोषात केली जाते. यामध्ये दहा दिवस विविध आरती, भक्तीगीतांच्याद्वारे गणपतीचे पूजन करण्यात येते, यासाठी सहजतेने या आरती उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने आरतीचे व्हीडीओ, ऑडीओंचे संकलन करुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचसोबत भविष्यात या माध्यमातून कोकणातील गरजू विद्यार्थ्यांना ऑनलाईन पुस्तके उपलब्ध करुन देण्यासारखे सामाजिक उपक्रम राबवण्याचे नियोजन असल्याची माहिती मंत्री श्री. चव्हाण यांनी यावेळी दिली.

वडूज येथे नर्सिंग कॉलेजला परवानगी : सचिन माने

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फायदा होणार

मायणी : ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे या हेतूने वडूज येथे नर्सिंग कॉलेज सुरू करण्यात आल्याची माहिती कॉलेजचे अध्यक्ष सचिन माने यांनी दिली. सचिन माने पुढे म्हणाले की ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना शिक्षणसाठी वेगवेगळ्या शहरात जावे लागते ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाचा खर्च राहण्याचा खर्च जेवणाचा खर्च परवडत नसल्यामुळे काही विद्यार्थ्यांना घरी बसल्याशिवाय पर्याय राहत नाही या सर्व गोष्टीचा विचार करून मायणी येथील सचिन माने यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी विद्यार्थिनींना नर्सिंगचा कोर्स करता यावा यासाठी वडूज येथे अद्यावत कॉलेज सुरू केले असून या सुवर्णसंधीचा फायदा खटाव माण सहित इतर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे .

सदरचा कोर्स हा तीन वर्षाचा असून यानंतर शंभर टक्के नोकरीची हमी या कोर्स द्वारे देण्यात येत आहे खाजगी व सरकारी नोकरी या कोर्स केल्यानंतर मिळणारच त्यामुळे बारावी पास विद्यार्थी विद्यार्थिनींनी हा कोर्स करून आपले भविष्य उज्वल करावे.

नेताजी सुभाषचंद्र बोस चॅरिटेबल ट्रस्ट मायणी संचलित श्री मंजुनाथ स्कूल ऑफ नर्सिंग या कॉलेजच्या माध्यमातून मान्यता प्राप्त इंडियन नर्सिंग कौन्सिल नवी दिल्ली, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल मुंबई, महाराष्ट्र राज्य सुश्रुषा व पॅरा वैद्यकीय मंडळ मुंबई, महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त या कोर्ससाठी शासन निर्णय प्रवेश मिळणार असून यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान ,शासकीय निम शासकीय, प्रदेशात, महानगरपालिका, नगरपालिका ,प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, खासगी रुग्णालय, जिल्हा परिषद रुग्णालय ,मध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी उपलब्ध होणार असून मुलींकरता सर्व सोयी नियुक्त होस्टेल व मेसची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी स्पेशलिस्ट रुग्णालय, मनोरुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, व ग्रामीण रुग्णालयांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे, यासाठी लागणारे सुसज कम्प्युटर लॅब व अनुभवी प्राध्यापक वर्ग यामुळे कॉलेज पूर्ण झाल्या झाल्या शंभर टक्के नोकरीची हमी या कॉलेजकडून देण्यात येत आहे सदर कोर्स हा जी एन एम ,डिप्लोमा कोर्स असून यासाठी शैक्षणिक पात्रता बारावी पास आर्ट, सायन्स ,कॉमर्स, कोणत्याही फॅकल्टीतून उत्तीर्ण असावा लागतो. सदर कॉलेज हे खाडे कॉम्प्लेक्स निरामय हॉस्पिटलच्या वर दहिवडी रोड वडूज येथे असून संपर्कासाठी ७३८५६८५४३१व ७३८५४२५४३१या क्रमांकावर विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा असे आवाहन अध्यक्ष सचिन माने यांनी केले आहे.

साताऱ्यात महिलेकडून युवकाला धक्काबुक्की

सातारा : तुला गाडी नीट चालवता येत नाही का असा जाब विचारून एका महिलेने अठरा वर्षाच्या युवकाला जिल्हा बँकेसमोरील चौकामध्ये धक्काबुक्की केल्याची घटना दिनांक २ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान घडली या प्रकरणी अबूबकर बागवान वय १८ राहणार बुधवार पेठ याने फिर्याद दिली आहे

प्राप्त माहितीनुसार अबूबकर आपल्या मित्रासमवेत बॉम्बे रेस्टॉरंट चौकाकडून पोवई नाक्याकडे निघाला होता जिल्हा बँकेसमोरच्या चौकात गाडी आली असता मागून येणाऱ्या महिलेने व त्याच्या मुलाने गाडी नीट चालवता येत नाही का असे खडसावून विचारत धक्काबुक्की केली तसेच दमदाटी केली पोलीस हवालदार देशमुख अधिक तपास करत आहेत

सातारा शहरात परत दुचाकी चोरींचे वाढते सत्र

सातारा : सातारा शहरांमध्ये दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन दुचाकी वाहनांची चोरी झाली आहे गुरुवार पेठ व सदर बाजार या ठिकाणी या चोऱ्या झाल्या असून सातारा शहर पोलीस ठाण्यात या घटनांची नोंद झाली आहे

पहिल्या फिर्यादीमध्ये अविनाश जाधव यांच्या मालकीची काळ्या रंगाची हिरो होंडा स्प्लेंडर एलबीएस कॉलेजच्या पिछाडीला आदमभाई मार्ग येथून अज्ञाताने चोरून नेली दुसऱ्या घटनेमध्ये संजय नामदेव पवार, वय ५७, राहणार प्रथमेश रचना सोसायटी सदर बाजार सातारा यांची पार्किंग मध्ये लावलेली हिरो होंडा स्प्लेंडर गाडी अज्ञाताने चोरून नेली या दोन्ही घटना दिनांक १ सप्टेंबर ते ३ सप्टेंबर या दरम्यान घडलेल्या आहेत .

दुचाकी चोरणाऱ्या अट्टल गुन्हेगारांची पुन्हा साताऱ्यात दहशत सुरू झाली आहे आगामी गणेशोत्सव काळाच्या पार्श्वभूमीवर सातारा शहर पोलिसांनी रात्रीचे पेट्रोलिंग सुरू केले आहे त्यामुळे या चोरीचा तातडीने तपास लागावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे पोलीस हवालदार शिंदे अधिक तपास करत आहे

आरळे येथे जुगार अड्ड्यावर धाड

सातारा : आरळे तालुका सातारा येथे दुकानाच्या आडोशाला जाणाऱ्या दुकानावर धाड मारून सातारा तालुका पोलिसांनी एकाला अटक केली आहे नितीन बजरंग करे वय २६ राहणार वाढे असे संबंधिताचे नाव आहे.

त्याच्याकडून एकूण पंधराशे रुपये किमतीचे जुगाराचे साहित्य करण्यात आले आहे दुकानाच्या आडोशाने गैरप्रकार चालत असल्याच्या तक्रारी पोलिसांना प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार पोलिसांनी पाळत ठेवून बुधवारी दुपारी ही कारवाई केली संबंधित आरोपीला ३५ (३) प्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे

मेडिकल कॉलेजच्या स्टोअर रूममध्ये चोरी

सातारा : मेडिकल कॉलेजच्या स्टोअर रूममधील ६४ हजार रुपयांचे इलेक्ट्रिक व इतर साहित्य चोरून नेल्याप्रकरणी सोमनाथ हनुमंत गुरव वय ३२ राहणार मरळी तालुका पाटण याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे या प्रकरणी विकास भानुदास सावंत वय ३० राहणार लिंब तालुका सातारा यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे

प्राप्त माहितीनुसार छत्रपती संभाजी महाराज वैद्यकीय महाविद्यालय सातारा येथे वैद्यकीय महाविद्यालयाचे नूतनीकरणाचे काम सुरू आहे तेथे स्टोअर रूममध्ये ठेवलेले ६० हजार रुपये किमतीचे केबल कॉपर तेरा बंडल, ५२०० स्क्वेअर मीटर वायर ४ हजार रुपये किमतीचे चार होलटेन बल्ब असा ६४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरला

अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरण एकावर गुन्हा

सातारा : सातारा लगतच्या एका उपनगरामध्ये अल्पवयीन युवतीचा विनयभंग प्रकरणी पोक्सो अंतर्गत उमर हरून बागवान वय ३२ राहणार शनिवार पेठ सातारा याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

दिनांक २ सप्टेंबर रोजी दुपारी एकच्या दरम्यान संबंधित युवती उपनगर परिसरातून घरी जात असताना आरोपी बागवान काळ्या रंगाच्या मोटरसायकलून आला त्याने संबंधित युवतीशी गैरवर्तन करून जबरदस्तीने तिला मोबाईल नंबर मागू लागला नंतर संबंधित युवतीला त्याने धमकी दिली पोलीस हवालदार येवले अधिक तपास करत आहेत.

विखळे येथे मराठा तरुण-तरुणीसाठी उद्योग मेळाव्याचे नियोजन

मायणी : विखळे तालुका खटाव येथे अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने मराठा समाजातील तरुण तरुणींना उद्योग व रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी कर्ज पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी मार्गदर्शन मेळाव्याचे नियोजन मराठा कार्यकर्त्यांच्या वतीने विखळे येथील ताई कन्वेक्शन हॉल या ठिकाणी आयोजित केलेले ची माहिती सुरेश आण्णा देशमुख यांनी दिली.

मराठा समाजातील युवा तरुण-तरुणींना हाताला काम मिळावे व रोजगाराच्या माध्यमातून त्यांची आर्थिक उन्नती व्हावी या हेतूने अण्णासाहेब पाटील महामंडळ यांच्यावतीने युवकांना

उद्योगधंद्यासाठी अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे या संदर्भातील माहिती व प्रशिक्षणासाठी कलेढोण परिसरातील असंख्य मराठा युवकांनी व युवतीने या मेळाव्यास उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे सदर मेळावा शुक्रवार दिनांक ६ रोजी विखळे फाटा येथील ताई कन्वेंशन हॉल या ठिकाणी आयोजित केलेला आहे तरी याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

संपाचा प्रवाशांबरोबर विद्यार्थ्यांना फटका

पाचगणीत बस स्थानक कामासाठी बंद तर प्रवासी रस्त्यावर

वाई : एसटी महामंडळाच्या कर्मचारी संपामुळे लाल परीची चाके पूर्णपणे थांबली असल्यामुळे या संपाचा फटका मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थी तसेच चाकरमान्यांना मोठ्या प्रमाणात बसला असून लोकांना आपल्या इच्छित स्थळे पोहोचण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी ही पाचगणी हे पर्यटन स्थळ तसेच शैक्षणिक केंद्र असल्याने या ठिकाणी परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी रोज ये जा करीत आहेत. महाबळेश्वर तालुका हा अती दुर्गम असल्याने डोंगर कपारीतून येणाऱ्या या विद्यार्थ्यांना एसटी शिवाय

दुसरा पर्याय नाही. परंतु दोन दिवस सुरू असणाऱ्या संपामुळे या विद्यार्थ्यांना आपले शैक्षणिक नुकसानीस सामोरे जावे लागले आहे.

तर पाचगणी व महाबळेश्वर येथे कामासाठी व रोजगारासाठी येणाऱ्या चाकरमान्यांना मात्र या संपाचा फटका बसला आहे. अनेक कामगाराना दळणवळणाची एसटी सेवा बंद झाल्याने कामावर येता येत नाही तर अनेकांनी चालत शहर गाठण्याचा प्रयत्न केला आहे. तर अनेक कामगार गाडी नसल्याने घरी बसून आहेत. त्यामुळे लवकरात लवकर या संपावर तोडगा मिळावा अशी मागणी या परिसरातील विद्यार्थी व नागरिक चाकरमान्यांनी केले आहे.

एस टी बस बंद असल्याने याचा फायदा आणि प्रवाशांचा गैरफायदा घेण्याचे काम खाजगी वाहन चालकांनी सुरू केला आहे अव्वाच्या सव्वा भाडे आकारून प्रवाशांची लूट करताना दिसत आहेत. त्यामुळे यावर नियंत्रण कोण ठेवणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पाचगणीत मात्र बस स्थानकाचे काम चालू असल्याने प्रवासी रस्त्यावर आहेत आणि आता संपामुळे प्रवासी अक्षरशः बेहाल झाले आहेत. त्यामुळे पाचगणी त प्रवासी संतप्त झाले आहेत.

एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप दुसऱ्या दिवशीही सुरुच

सातारा : एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप दुसऱ्या दिवशीही सुरुच होता. त्यामुळे प्रवाशांचे, विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात हात झाले. दरम्यान, खासगी वडाप मात्र सुसाट होते. ज्या ठिकाणी संघटनेच्या नेत्यांचे वर्चस्व आहे, त्या आगारातील एसटीच्या फेऱ्या बंद ठेवून प्रवाशांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरु आहे. त्यामध्ये कराड पूर्णत: बंद असून वडूज आगारात फक्त एकच फेरी सुरु आहे. महाबळेश्वर आगाराची मेढा आगाराच्या केवळ तीन फेऱ्या सुरु आहेत. दरम्यान, जे संपात सहभागी कर्मचारी आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु होणार असल्याची चर्चा सातारा आगारात सुरु होती.

एसटी कर्मचाऱ्यांचा संप दुसऱ्या दिवशीही सुरु असल्याने शहराकडे व कामानिमित्ताने जाणाऱ्यांची गैरसोय झाली. या संपामुळे कराड आगारातील सर्वच फेऱ्या रद्द झाल्या होत्या. मेढा आगारात केवळ तीन फेऱ्या सुरु होत्या. तर महाबळेश्वर आगारात २१ फेऱ्या, खंडाळा आगारातील १७ फेऱ्या, वडूज आगारात १ फेरी सुरु होती. सातारा आगाराच्या नियोजित फेऱ्या १५३ होत्या. त्यापैकी ४७ फेऱ्या रद्द झाल्या. कोरेगाव आगाराच्या नियोजित १५६ फेऱ्या होत्या. त्यापैकी १३५ फेऱ्या रद्द झाल्या. फलटण आगाराच्या १८६ नियोजित फेऱ्या होत्या. त्यापैकी १५४ फेऱ्या रद्द झाल्या, वाई आगाराच्या १६४ फेऱ्या नियोजित होत्या. त्यापैकी ८५ फेऱ्या रद्द झाल्या. पाटण आगाराच्या २४१ फेऱ्या नियोजित होत्या. त्यापैकी १३० फेऱ्या रद्द झाल्या. दहिवडी आगारातील १०८ फेऱ्या नियोजित होत्या. त्यापैकी १७ फेऱ्या रद्द झाल्या. मेढा आगारातील ७३ फेऱ्या नियोजित होत्या. त्यापैकी ७० फेऱ्या रद्द झाल्या. महाबळेश्वर आगारातील ११४ फेऱ्या नियोजित होत्या. त्यापैकी ९३ फेऱ्या रद्द करण्यात आल्या. पारगाव खंडाळाच्या नियोजित ६७ फेऱ्या नियोजित होत्या. त्यापैकी ५२ फेऱ्या रद्द झाल्या. वडूज आगारातील १९६ फेऱ्या होत्या. त्यापैकी १९५ फेऱ्या रद्द होत्या. सातारा जिल्ह्यातील ११ आगारातून १८७८ फेऱ्यापैकी १३९८ फेऱ्या रद्द करण्यात आल्या होत्या. या संपामुळे प्रवाशी, विद्यार्थी वर्गाचे बेहाल सुरु आहेत.

दीपक देशमुख अखेर ईडीच्या ताब्यात

साताऱ्यात कारवाई, दीड तास चौकशी

सातारा : मायणी मेडीकल कॉलेज प्रकरणात फसवणूकीचा दाखल असलेल्या सातारा आर्थिक गुन्हे शाखेत हजेरीसाठी आलेल्या दीपक देशमुख यांना अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) पथकाने अटक केली. बुधवारी दुपारी सातार्यात एलसीबी व आर्थिक गुन्हे शाखेत फिल्डींग लावून ईडीने ही कारवाई केली.

याबाबत अधिक माहिती अशी, मायणी मेडीकल कॉलेज अपहार प्रकरणातून गुन्ह्यांची मालिका दाखल झालेली आहे. वडूज पोलिस ठाणे तेथून सातारा आर्थिक गुन्हे शाखा व पुढे ईडीपर्यंत यातील गुन्हे वर्ग झालेले आहेत. दीपक देशमुख यांच्यावर मायणी मेडीकल कॉलेज प्रकरणातून २०२३ साली फसवणूकीचा गुन्हा दाखल असून त्याचा तपास सातारा आर्थिक गुन्हे शाखेतील सपोनि शिवाजी भोसले करत आहे. दीपक देशमुख यांना संबंधित गुन्ह्यात उच्च न्यायालयात जामीन मिळाला आहे. सातारा आर्थिक गुन्हे शाखेत तपासासाठी हजर राहण्यासह त्यांना अटी व शर्थीवर हा जामीन मिळाला आहे. दुसरीकडे दाखल एका अन्य गुन्ह्यात ईडी दीपक देशमुख यांच्या शोधात होती. दीपक देशमुख हे सातार्यात आर्थिक गुन्हे शाखेत हजेरीसाठी जात असल्याची माहिती ईडीला मिळाली. दि. २७ ऑगस्ट रोजी त्यांनी हजेरी लावली होती. तसेच ४ सप्टेबर रोजीही हजेरी होती. या प्रकरणात दीपक देशमुख सकाळी ११ आर्थिक गुन्हे शाखेत आले. तपासासाठी शाखेत गेल्यानंतर दोन मिनिटांमध्ये ईडीचे पथक त्यांच्यासमोर जावून थांबले. 'हम ईडी विभाग से हैं,' असे म्हणत त्यांचा ताबा घेत असल्याचे सांगितले. त्यानंतर दीपक देशमुख यांनी शांतपणे त्यांना सहकार्य करत असल्याचे सांगितले.

सेवानिवृत्त पोलीस संस्थेचे साताऱ्यात धरणे आंदोलन

सातारा : आमदार नितेश राणे यांनी पोलिसांना एकेरी भाषा वापरल्याच्या प्रकरणाचा साताऱ्यात निषेध करण्यात आला सेवानिवृत्त पोलीस बहुउद्देशीय संस्था सातारा यांचे वतीने धरणे आंदोलन करण्यात आले

आमदार नितेश राणे यांनी सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर येथील सभेमध्ये पोलिसांना दमदाटीची वक्तव्य वापरली या प्रकरणाचा पोलीस बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने निषेध करण्यात आला. निवेदनात नमूद आहे की आमदार नितेश राणे हे पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांबाबत बेताल वक्तव्य करीत आहेत त्यांच्या वक्तव्यावर निर्बंध आणावे त्यांनी बऱ्याच पोलीस अधिकाऱ्यांच्या आकसातून बदल्या केल्या आहेत त्या प्रकरणाची चौकशी करावी असे आव्हान यावेळी देण्यात आले.

मुलांनी स्पर्धा परीक्षेची कास धरावी : रविकांत बेलोशे

कळंबे महाराज पतसंस्थेच्यावतीने नव्या अधिकाऱ्यांचा सत्कार

वाई : जावली व महाबळेश्वर तालुक्यातील यूपीएससी व एमपीएससी परीक्षेत गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेले अधिकारी तसेच इतर गुणवंतांचा काटवली येथील कै. दत्तात्रय कळंबे महाराज नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने कर्तृत्वाचा गौरव सोहळा दापवडी येथील मुख्य कार्यालयात विवीध मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

यावेळी यूपीएससी, एमपीएससी परीक्षा तसेच विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या ओंकार पवार (जिल्हाधिकारी), वैभव गोळे (नगरपालिका प्रशासन),शेखर भिलारे(गटविकास अधिकारी),सूरज पाडळे (सहा. पोलीस उपनिरीक्षक), शुभम शिंदे (सहा.अभियंता वडूज),प्रणव गोळे (सहा.अभियंता महाबळेश्वर),प्रतीक राजपुरे (महाराष्ट्र पोलीस), सुहास भिलारे (महाराष्ट्र पोलीस),ओमकार गावडे (इंडीयन नेव्ही), संचित गावडे (इंडीयन आर्मी), सागर बेलोशे (सेवानिवृत्त आर्मी), सुधीर बेलोशे (सेवानिवृत्त आर्मी), निलेश बेलोशे (सेवानिवृत्त आर्मी), मानसिंग क्षीरसागर (सेवानिवृत्त आर्मी), सौ.शुभांगी पोफळे (लेखापरीक्षक) , कु.रोहिणी मांनकुमरे (कनिष्ठ सहा.जि प सातारा), सौ. कोमल पाटील(कनिष्ठ सहा. लिपिक), संजय जंगम (मंडलाधिकारी कराड),प्रतीक जाधव (तलाठी) कू.डॉ. तेजल शिंदे (आरोग्य), डॉ. समीर बेलोशे (आरोग्य), प्रवीण महाडीक (संगणक),सचिन रांजणे (सहकार), वीरेंद्र रांजणे (सहकार) या सर्व यशस्वी मान्यवरांचा हस्ते शाल, श्रीफळ आणि मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रविकांत बेलोशे, उपाध्यक्ष हरिश्चंद्र गावडे, ड. तुकाराम बेलोशे, नारायण जाधव, संचालक तुकाराम घाडगे, बाबुराव रांजणे, विजय रांजणे, शिवराम पवार, रामचंद्र चिकणे, मधुकर पवार, भीमराव खरात, रामचंद्र बेलोशे, व्यवस्थापक अनिल रांजणे, रमेश रांजणे, अशोक बेलोशे, रामदास रांजणे, दीपक पार्टे, बबनराव शिंदे तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात रविकांत बेलोशे यांनी मार्गदर्शन करताना सांगितलेआज मेहनतीशिवाय पर्याय नाही. स्पर्धा परीक्षेत आपली मुले गेली पाहिजेत. आपल्या विभागातील मुलांचे यश गगनाला भिडणारे असून त्यांच्या पाठीवर हात ठेवून त्यांचा आत्मविश्वास आणखी वाढावा आणि त्यांचे यशातून इतरांनी प्रेरणा घ्यावी हा एकच उद्देश आमचा आहे. सर्वांना संस्थेच्या वतीने शुभेच्छा.

या मुलांनी आपल्या घर, गाव आणि भागाचे नाव उंचावल्याचा आम्हाला गर्व वाटतो असे बाबुराव रांजणे यांनी सांगितले. आदरणीय कळंबे महाराजांच असे आपल्या भागातील अधिकारी व्हावेत हे स्वप्नं होते. परंतु ते पाहायला ते आज आपल्यात नाहीत याची खंत वाटते असे यावेळी तुकाराम घाडगे यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना सूरज पाडळे म्हणाले या सत्काराने आम्ही भारावलो असून अशीच समाजाची थाप गुणवंतांच्या पाठीशी राहिल्यास अनेक अधिकारी घडतील असे सांगितले.

सूत्रसंचालन गणेश पोफळे यांनी सूत्रसंचलन केले. प्रास्ताविक अनिल रांजणे यांनी केले तर हरिश्चंद्र गावडे यांनी आभार मानले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

विद्यार्थ्यांना 'गुड टच, बॅड टच'चे धडे

मसूर पोलीस ठाणे निर्भया पथकाचा उपक्रम : हद्दीतील अंगणवाडी, शाळा, महाविद्यालयात मार्गदर्शन

मसूर : सध्या सर्वत्र वाढत असलेल्या महिला व मुली यांच्यावरील अत्याचाराच्या घटनांच्या अनुषंगाने मसूर पोलिस ठाणे हद्दीतील प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये महाविद्यालये तसेच अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना महिला अत्याचार आणि संरक्षणार्थ उपाययोजनेंतर्गत मसूर पोलीस स्टेशनच्या वतीने मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.

यामध्ये पोलिस ठाण्याच्या वतीने हद्दीतील सर्व शाळा, महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांनी गुड टच, बॅड टच कसा ओळखायचा व आपल्या संरक्षणासाठी काय करायचे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच तक्रार पेटी, छेडछाड, मेसेज, चित्रीकरण आदी बाबींची माहिती देण्यात आली, तसेच मुलामुलींची सुरक्षितता हा महत्त्वाचा विषय असल्याचे समजून सांगितले.

मसूर : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स.पो.नि.विठ्ठल शेलार समवेत शिवाजी पवार व शिक्षिका.

मसूर पोलिसांनी 'गुड टच बॅड टच'चे धडे देतानाच. मुलींच्या दक्षतेसाठी राबविण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली. यावेळी शाळा व्यवस्थापनाला योग्य त्या उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशा सूचना मसूर पोलिस ठाण्याचे पोनि विठ्ठल शेलार यांनी केल्या.

मसूर पोलीसांनी हद्दीतील अंगणवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालय, या ठिकाणी शिक्षकवर्ग, विद्यार्थीना तसेच पालक यांना महिलांवर होणारे अत्याचार, शाळेमध्ये घडु नयेत. या अनुषंगाने केलेल्या सुरक्षितेसाठी उपाययोजनांची माहिती दिली. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या कमी असणाऱ्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे यासह सोयीसुविधा वाढवण्यासाठी सक्त सूचना पोनि शेलार यांनी केल्या आहेत. मुला-मुलींना सतर्क राहण्याबाबत त्यांनी आवाहन केले. शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करुन घ्यावी मुलींच्या विभागासाठी स्वतंत्र महिला कर्मचारी नियुक्त कराव्यात, प्रत्येक महिन्याला पालक-विदयार्थी मिटींग घेऊन त्यांच्या अडीअडचणी ऐकुन त्याचे निरसन करण्यात यावे. तसेच पोलीस काका व दिदी यांनी मुला-मुलींना 'गुड टच बॅड टच' बाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी हवालदार अशोक पाटील, पोलिस पाटील वेल्हाळ, मुख्याध्यापक शिवाजी पवार, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

> शैक्षणिक संकुलांमध्ये कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नसल्याचा सज्जड दम देत रोडरोमीओंच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पालकांनी मुलांकडे दुचाकी देवु नये अन्यथा पालकांवर कारवाई करण्यात येईल. विद्यार्थिनींना कोणीही अशाप्रकारे त्रास देत असेल, तर तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, तसेच आपले शिक्षक आई-वडील नातेवाईक यांना माहिती द्यावी, मनात कोणतीही भीती बाळगू नये. कोणत्याही प्रसंगी अडचण आली तर मसूर पोलीस, महिला हेल्पलाईन नंबर १०९१, १०९८, ११२, निर्भया पथकाशी संपर्क साधावा.
>
> **- विठ्ठल शेलार, पोलिस निरीक्षक**

> शाळा, कॉलेज, क्लासेस, तसेच बसस्थानक परिसरात टवाळखोरांचा राबता कायमच असतो. पोलिसांनी त्यांच्यावर वॉच ठेवून त्यांना शासन केले पाहिजे. मुलींनी तक्रार केली, की, तत्काळ त्याची दखल घेऊन शहानिशा करत कायदेशीर कठोर कारवाई केली पाहिजे, तसेच टवाळखोरांच्या कुटुंबीयांना बोलावून त्यांच्या समक्ष समज दिली पाहिजे.
>
> **- शिवाजी पवार, मुख्याध्यापक शिवाजी विद्यालय.**

संक्षिप्त वृत्त

नागनाथनगर : महिला मेळाव्यात बोलताना डॉ. शीतल बाबर

अंगणवाडी सेविका व आशा सेविकांच्या पाठीशी ठाम राहणार : डॉ. बाबर

विटा : कोरोनासारखी महामारी असो किंवा समाजावर आलेली कोणतीही संकटे असो अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांनी केलेले कार्य हे समाजासाठी उपकृत करणारे आहे. त्याचीच जाणिव ठेवून फुल ना फुलाची पाकळी म्हणून त्यांचा सन्मान करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. या भगिनींना भविष्यात त्यांच्या कामासाठी बळ मिळावे व त्यांच्या हातुन अशीच सेवा घडो हा आमचा त्यामागील उद्देश आहे. या सर्व अंगणवाडी सेविका व आशा सेविकांच्या पाठीशी आम्ही ठामपणे कायम उभे आहोत व भविष्यातही उभे राहू अशी ग्वाही संजय गांधी निराधार योजनेच्या अध्यक्षा डॉ. शीतल बाबर यांनी दिले

नागनाथनगर (ता. खानापूर) महिला मेळाव्यात डॉ. शीतल बाबर बोलत होत्या. जिल्हा बँकेचे संचालक अमोल बाबर यांच्या संकल्पनेतून युवक नेते सुहास बाबर यांनी प्रत्येक आशा सेविका व अंगणवाडी सेविकांना रक्षाबंधन भेट हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाच्या निमित्ताने आयोजित महिला मेळाव्यात डॉ. शितल बाबर मार्गदर्शन करत होत्या. याप्रसंगी डॉ. शीतल बाबर यांनी महिलांना संजय गांधी निराधार योजने बरोबर श्रावणबाळ योजना, कुटूंब कल्याण निधी, लाडकी बहिण योजना अशा अनेक लाभाबाबत माहिती दिली. यावेळी माजी सरपंच, जेष्ठ नेते मनीषा निकम, वैशाली निकम, सुभद्रा नलवडे, अर्चना बाबर, समर्पण फौंडेशन सदस्या वनिता शितोळे, वर्षा साळुंखे, पुजा म्हेत्रे व सर्व ग्रामस्थ महिला उपस्थित होत्या.

जुळेवाडी : रस्ता सुधारीकरण कामाचे भूमिपूजन करताना भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. अतुल भोसले.

जुळेवाडीच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देण्यासाठी प्रयत्नशील : डॉ. भोसले

कराड : महायुती सरकारच्या माध्यमातून कराड दक्षिण मतदारसंघात पाणंद रस्त्यांसाठी ४५ कोटींचा निधी आणला आहे. येत्या काळात जास्तीत जास्त निधी आपल्या भागाला मिळवून देण्याचा माझा प्रयत्न आहे. तसेच जुळेवाडीच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देण्यासाठी मी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. अतुल भोसले यांनी केले. जुळेवाडी (ता. कराड) येथे रस्ता सुधारीकरण कामाच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र शासनाच्या मनरेगा अंतर्गत अतिरिक्त राज्य कुशल निधीतून डॉ. अतुल भोसले यांच्या विशेष प्रयत्नातून जुळेवाडीत अंतर्गत रस्ता सुधारीकरण करण्यासाठी १० लाख रुपयांचा विकासनिधी मंजूर झाला आहे. याचे भूमिपूजन डॉ. भोसले यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना डॉ. भोसले म्हणाले, शासनाच्या विविध योजनांचा लाभ कराड दक्षिणमधील लाभार्थींना मिळवून देण्यासाठी आपले कार्यकर्ते झटत आहेत. शासनाच्या योजना प्रभावीपणे तळगाळात पोहचू लागल्याने काहीजणांना पोटशूळ उठला आहे. विरोधक या योजनांबाबत अपप्रचार करत आहेत. पण ग्रामस्थांनी त्याकडे लक्ष न देता या योजनांचा लाभ घ्यावा.

यावेळी जुळेवाडी येथील यशवंत काशीद, निशांत पाटील यांच्यासह अनेक युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. डॉ. अतुल भोसले यांनी त्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाला जुळेवाडीचे सरपंच नितीन बाकले, उपसरपंच सुभाष पाटील, ग्रामपंचायत सदस्य शुभम बाकले, अधिक सोमदे, अरविंद साळुंखे, महादेव सोमदे, धनाजी देशमुख, अधिक साळुंखे, जयवंतराव साळुंखे, पंजाबराव मोहिते, श्रीकृष्ण कुलकर्णी, दिनकर सावंत, आबा सावंत, रत्नाकर पाटील, विशाल गायकवाड, अक्षय कांबळे, पांडुरंग भोसले, दीपक कुंभार, विजय थोरात, अमरजीत पुजारी, गणेश कार्वेकर, संकेत पाटील, बिरदेव कोळी यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाटणमध्ये ई-पिक पाहणीसाठी प्रशासन सज्ज

पाटण : तालुक्यातील शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजना, तसेच पिक नुकसान भरपाई मदतीसाठी आपली ई-पिक पाहणी करून घेण्यासाठी तालुका प्रशासनाने कंबर कसली आहे.

प्रांताधिकारी सोपान टोणपे, तहसीलदार अनंत गुरव थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन ई- पिक पाहणी नोंदीचे महत्त्व पटवून देत आहेत. कोयना भागातील रासाटी, गोषटवाडी येथे प्रांताधिकारी, तहसीलदार व महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष खातेदारांच्या शेतामध्ये जाऊन ई-पिकपाणीची नोंद करण्यात आली.

मंद्रुळकोळे सोसायटीच्या चेअरमनपदी दादासाहेब साळुंखे यांची निवड

तर व्हा. चेअरमनपदी शिवाजीराव शिंदे यांची बिनविरोध निवड

ढेबेवाडी : पाटण तालुक्यात संवेदनशील समजल्या जाणाऱ्या मंद्रुळकोळे ता. पाटण येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी काँग्रेसचे नेते हिंदुराव पाटील यांचे कट्टर समर्थक दादासाहेब साळुंखे तर व्हा. चेअरमनपदी शिवाजीराव शिंदे. यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

मंद्रुळकोळे सोसायटीचे चेअरमन सुभाष पाटील व व्हा चेअरमन दादासाहेब साळुंखे यांनी या अगोदर आपल्या पदाचे राजनामे सचिवाकडे दिले होते. त्यानंतर नुकतीच चेअरमन, व्हा चेअरमन पदाच्या निवडी करण्यात आल्या.

मंद्रुळकोळे खुर्द : नवनिर्वाचित चेअरमन, व्हा चेअरमन यांचा सत्कार करताना हिंदुराव पाटील व संचालक.

यावेळी काँग्रेसचे प्रांतिक प्रतिनिधी हिंदुराव पाटील, पाटण तालुका खरेदी विक्री संघाचे माजी संचालक आत्माराम कदम, संचालक सुभाष पाटील, अशोकराव पाटील, संजय पाटील, बापूसो मोरे, शिवाजी शिंदे, जोतीराम काटकर, पांडुरंग पुजारी, नथुराम ढेब, धोंडीराम कांबळे, प्रकाश ढेब, कमल पाटील, निलम पवार, माजी सरपंच अमोल पाटील, मंद्रुळकोळे खुर्द उपसरपंच संजय लोहार तसेच सभासद ग्रामस्थ उपस्थित होते.

संचालक मंडळ व संस्थेचे मार्गदर्शक हिंदुराव पाटील यानी टाकलेला विश्वास सार्थ करून शेतकरी सभासदांच्या हितासाठी काम करणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष दादासाहेब साळुंखे यांनी सांगितले. आत्माराम कदम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सचिव संजय पाटील यांनी प्रास्ताविक केले तर शिवाजीराव शिंदे यांनी आभार मानले.

> मंद्रुळकोळे सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी सभासदांना शासनाच्या असलेल्या विविध योजनांचा चांगल्या प्रकारे लाभ दिला जात आहे. तेव्हा सभासदानी घेतलेल्या कर्जाची वेळेत परत फेड करणे गरजेचे आहे. या संचालक मंडळातील सर्व संचालकांना सहकारातला चांगला अनुभव असल्याने त्याचा सोसायटीला चांगला फायदा होईल.
>
> **- हिंदुराव पाटील,**
> **काँग्रेसचे प्रांतिक प्रतिनिधी.**

एस.एम.एस. इंग्रजी स्कूलमध्ये साहित्य संमेलन उत्साहात

कराड : शिक्षण मंडळ कराडच्या एस. एम. एस. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सोमवार दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी, शालेय स्तरावरील चौथे विद्यार्थी साहित्य संमेलन उत्साहात साजरा करण्यात आले. विद्यार्थ्यांच्यात शालेय अभ्यासक्रमातील पुस्तकात समाविष्ट असलेल्या साहित्याबरोबरच श्रवण, मनन, चिंतन, निदिध्यासन, या क्रमाने शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक असा वैचारिक विकास व्हावा याकरिता आवश्यक असलेले ज्ञान प्राप्त होण्यासाठी श्रवण, अवांतर वाचन, लेखन आदि सर्जनशीलता जागृत व्हावी, सर्जनशीलतेचा विकास व्हावा, यासाठीचा प्रयत्न म्हणून दर वर्षी अशा प्रकारच्या विद्यार्थी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जात आहे. याकरिता आपल्या संस्थेचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रेरणा नेहमी मिळत असतेच.

संस्थेचे सहसचिव, राजेंद्र लाटकर, काकडे साहेब, संस्था गठित निरीक्षक समितीचे पदाधिकारी, सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक संतोषकुमार गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरुषोत्तम देशपांडे, सुहास नारायण इनामदार यांच्या हस्ते या साहित्य संमेलनाचे औपचारिक उद्घाटन झाले.

शाळेच्या संगीत विभाग प्रमुख, संगीत अलंकार योगिता जोशी व संगीत विभाग यांनी गणेश स्तुती, सरस्वती स्तवन, ईशस्तवन गायन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

आगामी विधानसभेसाठी मी जनतेचा उमेदवार : सुहास बाबर

विटा : स्वर्गीय आमदार अनिल भाऊ बाबर यांनी पक्ष व गटातटाच्या पुढे जाऊन विसापूर सर्कलचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी मी महायुतीचा उमेदवार म्हणून आपणासमोर येत असलो तरी मलाही सर्व स्तरातून पक्ष, गट-तट विसरून लोक पाठबळ देत आहेत. याची जाणीव मी कायमस्वरूपी ठेवीन. आज लोकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून मी जनतेचा उमेदवार आहे असे प्रकर्षाने जाणवत आहे असे मत जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष सुहास बाबर यांनी केले

बोरगाव (ता.तासगाव) येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन बाबर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पार पडले. यावेळी सुहास बाबर बोलत होते

महादेव मळा ते बोरगाव, बोरगाव ते पंचक्रोशी हायस्कूल, बोरगाव ते नवे बोरगाव व बोरगाव ते आळते रस्ता करणे या कामांचे उद्घाटन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास

बोरगाव : येथे विविध विकासकामांचे भूमिपूजनप्रसंगी सुहास बाबर समवेत निवास पाटील, डॉ. प्रताप पाटील, नवनाथ पाटील, संदीप पाटील व इतर मान्यवर

बोरगावचे ज्येष्ठ नेते माजी जिल्हा परिषद सदस्य निवासनाना पाटील, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक डॉ. प्रताप पाटील, नवनाथ पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती संभाजी पाटील, संदीप पाटील, अरुण खरमाटे, धनाजी पाटील, पोपट पाटील, सागर पाटील, चंदू पाटील, किरण पाटील प्रमुख उपस्थित होते.बाबर पुढे म्हणाले, स्वर्गीय आमदार अनिल भाऊंना विसापूर सर्कल या परिसराने सलग दोन निवडणुकीत मोलाची साथ दिली. आमदार भाऊंनी देखील विसापूर सर्कलमधील गावोगावी आणि वाड्यावस्त्यांचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आमचे आणि विसापूर सर्कलचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहे आहेत. हे संबंध अतूट ठेवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. तुम्ही जे प्रेम मला आज स्वर्गीय भाऊंच्या पाशा:त देत आहात त्यामुळे मी अक्षरशः भारावून जात आहे.

सचिवांच्या प्रश्नासाठी नेहमीच तत्पर राहणार : अमोल बाबर

विटा : सर्व सेवा सोसायटीचे सचिव म्हणजे सहकाराचा कणा असतात. त्यांच्या सर्व अडीअडचणी आणि प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्वर्गिय आमदार अनिल भाऊंच्या प्रमाणेच मी देखील नेहमी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक युवक नेते अमोल बाबर यांनी दिली.

खानापूर तालुक्यातील सर्व सोसायटी सचिवांशी अमोल बाबर यांनी संवाद साधला.सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संचालक म्हणून बाबर यांची निवड झाल्याबद्दल यावेळी तालुक्यातील सर्व सचिवांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना बाबर म्हणाले सहकारामुळे समाजाची प्रगती झाली. शेतकऱ्यांच्या जीवनमानात नंदनवन फुलवण्याचे काम सर्वसेवा सोसायटी करतात. आज काही सोसायटी राज्य व देश पातळीवरील लौकिक निर्माण करत आहेत. त्यामध्ये सचिवांची भूमिका हे अत्यंत मोलाची आहे. त्यामुळे सचिव हा घटक सहकारात अत्यंत महत्त्वाचा आहे . स्वर्गीय आमदार अनिलभाऊ बाबर यांनी नेहमीच सचिवांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले होते मी जिल्हा बँकेचा संचालक या नात्याने तसेच माझ्यासोबत सुहासभैया बाबर आम्ही दोघेही सचिवांच्यासाठी त्यांच्या प्रश्नांसाठी नेहमी तत्पर राहू अशी ग्वाहीही अमोल बाबर यांनी दिली.

सांगली : अमोल बाबर यांची जिल्हा बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना सर्व सेवा सोसायटीचे सचिव

दिव्यांगांच्या आयुष्यात बीडीओंनी पेरला आनंद

एकाच दिवशी ६७ दिव्यांगाना प्रमाणपत्रांचे वाटप : डॉ. संताजी पाटील यांचा पुढाकार

विटा : खानापूर पंचायत समिती ही नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात नेहमीच अग्रभागी असते. नुकताच गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील यांच्या पुढाकाराने विटा ग्रामीण रुग्णालयात जिल्हा शल्यचिकित्सक विभाग व खानापूर पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांगांचे आरोग्य तपासणी शिबिर व प्रमाणपत्र वाटप याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तालुक्यात ६७ दिव्यांगांना प्रमाणपत्र देण्यात आली. यावेळी दिव्यांगांच्या चेहरे आनंदून गेले होते. बीडिओ डॉ. संताजी पाटील यांनी दिव्यांगांच्या आयुष्यात आनंद पेरला. डॉ. पाटील यांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी डॉ. विक्रमसिंह कदम यांचे सहकार्य लाभले.

विटा : येथील दिव्यांगांना प्रमाणपत्रांचे वाटप करताना गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संतोष बाबर आदी.

दिव्यांगांना शासकीय सवलती घेण्यासाठी दिव्यांग प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ते मिळविण्यासाठी दिव्यांगांना जिल्ह्याच्या ठिकाणी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यासाठी नाहक त्रास होत होता. त्यांची पूरती दमछाक होत असे. त्यांची गैरसोय लक्षात होता. गटविकास अधिकारी डॉ पाटील यांनी विटा ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात दोन दिवसांपूर्वी जिल्हास्तरीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना पाचारण केले.दिव्यांगांच्या आरोग्य तपासणी केली. कागदपत्रांची पूर्तता करून एकाच दिवशी दिव्यांगांना प्रमाणपत्र दिले. ९७ जण सहभागी झाले होते. त्यापैकी ६७ जणांना प्रमाणपत्र सुर्पुद केले. या शिबिरात अस्थिव्यांग, दृष्टीदोष, मानसिक विकलांगता, व सिरेब्राल पालसी इत्यादीची तपासणी करण्यात आली.

यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष बाबर, डॉ. अनिल लोखंडे, डॉ. विशाल नलवडे, डॉ. दीपाली पाटील, डॉ. दीपाली खरात, डॉ. रतिनंद कांबळे, डॉ. प्रज्ञा पाटील, डॉ. शकील येलूरकर, डॉ. व्ही. एल. धवन, डॉ. गायत्री वडगावे, डॉ. गजानन साळेकर, सुरज जंगम, अभिजीत पाटील यांनी दिव्यांगांची तपासणी केली.

> तालुक्यातील दिव्यांगांचे प्रमाणपत्राअभावी त्यांना शासकीय सवलतीचा लाभ देता येत नव्हता. त्यांच्यासाठी एकाच जिल्ह्याच्या ठिकाणी न जाता तालुक्याच्या ठिकाणी एकाच दिवशी प्रमाणपत्र दिले. यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी डॉ. विक्रमसिंह कदम यांचे मोठे सहकार्य लाभले आहे. दिव्यांगांना तालुक्याच्या ठिकाणी प्रमाणपत्र देता आली पाहिजेत. अशी दिवंगत आमदार अनिल बाबर यांची अपेक्षा होती. त्याची पुर्तता झाली.
>
> **- डॉ. संताजी पाटील,**
> **गटविकास अधिकारी खानापूर**

अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जेलभरो

कोल्हापूर : मानधन वाढीसह प्रलंबित मागण्यांकडं शासनाचं लक्ष वेधण्याकरिता अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं करत जेलभरो आंदोलन केलं. यावेळी आंदोलनकर्त्या महिला आणि पोलिसांमध्ये मोठी झटापट झाली.

राज्यभरातील सुमारे दोन लाख अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी ४ डिसेंबर २०२३ रोजी बेमुदत संप पुकारला होता. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका देखील सहभागी झाल्या होत्या.

यावेळी, राज्य सरकारनं अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनांमध्ये वाढ करण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र, अद्याप मानधनांमध्ये वाढ झाली नाही. या मागणीसह त्यांच्या विविध मागण्या अजूनही प्रलंबित आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनांमध्ये भरीव वाढ झालेली नाही. तसंच सर्वोच्च न्यायालयानं ग्रॅज्युटी बाबत दिलेल्या निकालाची अद्याप अंमलबजावणी झाली नाही.

या प्रलंबित मागण्यांकडं लक्ष वेधण्यासाठी कोल्हापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी युनियनच्या वतीनं जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं करत जेल भरो आंदोलन करण्यात आलं. यावेळी आक्रमक झालेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली. रस्त्यावरच ठिय्या मारलेल्या या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. यावेळी आंदोलनकर्त्या महिला आणि पोलिसांत मोठी झटापट झाली. या आंदोलनामध्ये जयश्री पाटील, सरिता कंदले, अर्चना पाटील, शोभा भंडारे, मंगल गायकवाड, सुरेखा कोरे, दिलशाद नदाफ, विद्या कांबळे यांच्यासह अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येनं सहभागी झाल्या होत्या.

तासगाव पोस्ट कार्यालयात ४२ हजारांचा अपहार

तासगाव : येथील पोस्ट कार्यालयात खातेदाराच्या खात्यावरील व्याजाची जमा झालेली रक्कम परस्पर काढून ४२ हजारांचा अपहार केल्याची घटना उघडकीस आली.

याप्रकरणी डाक सहाय्यक याच्याविरोधात तासगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. अनंता ज्ञानेश्वर वायाळ (रा. ताखरखेड वायाळ, जि. बुलढाणा) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याबाबत सहाय्यक डाक अधीक्षक विनायक कुलकर्णी यांनी फिर्याद दिली आहे. संशयित वायाळ याने कार्यालयातील सहकारी कर्मचाऱ्यांचे संगणकाचे युजर आयडी आणि पास वर्डचा गैरवापर करून खातेदाराच्या खात्यावर जमा झालेले अधिकचे व्याजाची रक्कम हे तासगाव पोस्ट मास्टर यांच्या संड्री खात्यामधून परत न करता खात्यामध्ये पैसे काढण्याचे फार्म लिहून खातेदाराच्या बनावट सह्या करून ४२ हजार १४० रुपयांचा अपहार केला. तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक गायकवाड करीत आहेत.

यावेळी भाजप मुक्त दौंड, प्रमुख कार्यकर्ते यांची गुप्त खलबत

दौंड : आगामी दौंड विधान सभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत भाजप मुक्त दौंड तालुका करायचाच. असा स्पष्ट निर्धार भाजप विरोधी कार्यकर्ते यांनी पुणे येथे एका आलीशान हॉटेलमध्ये झालेल्या गुप्त बैठकीत घेण्यात आला आहे.या बैठकी बाबत अत्यंत गुप्तता पाळण्यात आली होती.

तरीही आमचे ऊप संपादक आणि पुणे जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकार यांनी दिलेली अधिक माहिती अशी, पुणे येथील आलीशान हॉटेलमधुन बाहेर पडलेले कार्यकर्ते यांना पाहून काय विशेष असे विचारले असता, ते म्हणाले, तात्या, सर्व सांगतो. परंतु माझे नाव छापून नका. ही अट मान्य करताच मिळालेली अधिक माहिती अशी, लवकरच विधान सभा निवडणुका लागणार आहेत. आगामी काळात राज्यात शिंदे सेना अ. प. राष्ट्रवादी आणखी अनाजी पंत भाजप सत्तेवर येणे राज्य हितावह नाही

विषेसत दौंड मध्ये भाजपचा आमदार होणे हे आगामी काळात तालुक्याला घातक आहे.

यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत भाजपचा पराभव करणे ही काळाची गरज असुन भविष्यातील दौंड तालुक्याच्या हितावह आहे. यांची खात्री वाटल्याने पुणे येथील आलीशान हॉटेलमध्ये बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत भाजपाचे शेतकरी, सर्व सामान्य नागरीक, कामगार, बेरोजगारी, महागाइ, फसव्या घोषणा याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

यासह दौंड तालुका भाजप आमदार यांनी दौंडचया जनतेशी केलेली भलावन . या बाबतही अनेक मुद्यांवर चर्चा झाली.

विशेष बाब म्हणजे आगामी काळात दौंडला भाजप आमदार कोणत्याही परिस्थितीत नकोच. भाजप मुक्त दौंड करायचाच या विषयावर या बैठकीत एकमत झाल्याचे पुढे आले आहे.

या बैठकीस गेल्या विधानसभा २०१९ चया निवडणुकीत भाजप आमदार यांना निवडुंन आणण्यासाठी भगीरथ प्रयत्न केलेले कार्यकर्ते प्रा मुख्याने उपस्थीत होते.

या सह या बैठकीस कांग्रेस, राष्ट्रवादी चे दोन्ही गटांचे कार्यकर्ते , शिवसेना ऊबाठा गट आणी अन्य संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

दौंड मध्ये भाजप विरोधी प्रचंड नाराजी आहे. ही नाराजी आणि अन्य जास्त प्रमाणात भाजप विरोधी प्रथमच एकत्र आल्याने यावेळच्या निवडणुकीत दौंड मध्ये भाजप उमेदवार पराभूत करण्यासाठी जोरदार प्रयत्न होणार असल्याचं पुढे आले आहे . आणखी भाजप उमेदवाराचा पराभव करणारच असा ठाम निर्धार यावेळी या कार्यकर्त्याने व्यक्त केला आहे.

विशेष ---- याबाबत तुमचा निर्णय ठिक आहे, भाजपने आपल्याला आमिष दाखवले तर आपण बदलुन शकता. यावर आम्ही ठाम आहोत. कोणी बदलूले तरी भाजप पराभव अटळ आहे . अशी ठाम खात्री या कार्यकर्त्याने व्यक्त केली आहे.

दुचाकी चोर दोन अटक

पुणे : पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालया अंतर्गत मोटार सायकल चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता मा. पोलीस आयुक्त सारे, श्री. विनयकुमार चौबे यांनी पोलीस स्टेशन हद्दीतील मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्याना आळा घालण्यासाठी प्रभावीपणे उपाययोजना राबविणे व गुन्हे उघडकीस आणणे बाबत आदेशीत केले होते.

त्याअनुषंगाने देहुरोड पोलीस स्टेशनचे तपास पथकाला काही इसम चोरीची दुचाकी देहुरोड बाजार परीसरात स्वामी चौक येथे घेवुन येणार आहे अशी बातमी मिळाली त्या बातमीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी सापळा लावला असता बातमी प्रमाणे दोन इसम एका दूचाकी ज्युपीटर स्कुटर याच्यावरुन आले त्यांना तपास पथकांच्या अंमलदारानी शिताफीने ताब्यात घेतले त्यांचे नाव १) आकाश शंकर जाधव, वय २४ वर्ष, रा.टॉवर लाईन, चिखली, मु.पत्ता. कोळसुर, ता. उमरगा, जि. उस्मानाचाद २) आशुतोष नानासाहेब घोडके, वय २३ वर्ष रा. गुरदत्त ही. सोसायटी, त्रिवेणीनगर, टॉवलाईन, चिखली प्रमाणे असुन त्यांच्या ताब्यात मिळून आलेली दुचाकी मोटार स्कूटी बाबत अधिक तपास केला असता सदरची मोटार स्कूटी ही देहूरोड पोलीस स्टेशन गुरनं. ३४७/२०२४ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता या गुन्ह्यातील चोरीस गेल्याची असल्याचे निष्पन्न झाले.

जिल्ह्यातील २१ बंधारे पाण्याखाली राधानगरी धरणातून २ हजार ९२८ क्युसेक विसर्ग

कोल्हापूर : जिल्ह्यातील राधानगरी धरणात ८.२६ टीएमसी पाणीसाठा आहे. आज सकाळी ७ च्या अहवालानुसार राधानगरी धरणाचा स्वयंचलित दरवाजा क्र. ६ खुला असून सध्या धरणातून २ हजार ९२८ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

पंचगंगा नदीवरील- शिंगणापूर, राजाराम, सुर्वे, रुई, इचलकरंजी, तेरवाड, शिरोळ व रुकडी, वेदगंगा नदीवरील- शेणगाव, ताम्रपर्णी नदीवरील- चंदगड, भोगावती नदीवरील- हळदी, राशिवडे, खडक कोगे व सरकारी कोगे, दुधगंगा नदीवरील -दत्तवाड, सिध्दनेर्ली व बाचणी, वारणा नदीवरील - चिंचोली, हिरण्यकेशी नदीवरील- ऐनापूर व साळगाव, कासारी नदीवरील- यवलूज असे एकूण २१ बंधारे पाण्याखाली आहेत.

आपल्या जिल्ह्यातील धरणांमध्ये पुढीलप्रमाणे पाणीसाठा आहे. राधानगरी ८.२६ टीएमसी, तुळशी ३.४७ टीएमसी, वारणा ३४.०२ टीएम सी, दूधगंगा २३.६३ टीएमसी, कासारी २.७७ टीएमसी, कडवी २.५२ टीएमसी, कुंभी २.७१ टीएमसी, पाटगाव ३.७२ टीएम सी, चिकोत्रा १.५२ टीएमसी, चित्री १.८९ टीएमसी, जंगमहट्टी १.२२ टीएमसी, घटप्रभा १.५६ टीएमसी, जांबरे ०.८२ टीएमसी, आंबेआहोळ १.२४ टीएमसी, सर्फनाला ०.४८ व कोदे लघु प्रकल्प ०.२१ टीएमसी इतका पाणीसाठा आहे.आज सकाळी ७ च्या अहवालानुसार बंधाऱ्यांची पाणी पातळी पुढीलप्रमाणे आहे. राजाराम २३.४ फूट, सुर्वे २२.७ फूट, रुई ५१.९ फूट, इचलकरंजी ४९.६ फूट, तेरवाड ४५ फूट, शिरोळ ३५.९ फूट, नृसिंहवाडी ३४ फूट, राजापूर २३.१० फूट तर नजीकच्या सांगली ११.६ फ ूट व अंकली १४.१ फूट अशी आहे.

टिळक मेमोरियलच्या जागेतील पार्किंग वर आक्षेप

सातारा : येत्या गणेशोत्सवामध्ये टिळक मेमोरियल चर्चच्या वहिवाटीच्या जागेवर वाहनांसाठी पार्किंग सोय करण्याचे सातारा पालिकेचे नियोजन आहे .या धोरणावर मेमोरियल चर्चा पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे आक्षेप घेतला आहे याचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांना देण्यात आले या निवेदनावर २३ पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत

टिळक मेमोरियल चर्च साताराचे संचालक प्रकाश भोसले, अंशुमन गायकवाड ,कपिल गायकवाड ,राजेश अल्वा, नरेंद्र भालेकर, दिनेश काळे, विक्रम नांदणीकर, भोरे ,लीना साळवी या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले

निवेदनात नमूद आहे की सातारा पालिकेने २८ ऑगस्ट २०२४ च्या बैठकीनुसार टिळक मेमोरियल चर्चेच्या मोकळ्या जागा परिसरात पे अँड पार्क सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे .मात्र ही चर्चा मालकीची वहीवाटीची जागा आहे यापूर्वी सुद्धा अशा प्रकारच्या झालेल्या निर्णयावर चर्चेने वेळोवेळी पालिकेची पत्रव्यवहार केला आहे टिळक मेमोरियल शहर पोवई नाका येथील चर्च जवळपास १७० वर्ष जुने आहे या चर्चच्या बाजूला असलेल्या जागेवर कविवर्य नारायण वामन टिळक हे उपासना करत असत त्यामुळे ख्रिस्ती बांधवांसाठी ही जागा पवित्र आहे

येथे दुसरे कोणतेही काम झाल्यास ख्रिस्ती बांधवांच्या भावना दुखावल्या जातील याबाबतची जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी आणि ख्रिस्ती ध बांधवांची ही संवेदनशील मागणी राज्य शासनाने मान्य करावी असे निवेदनात नमूद आहे.

कायम असेल तर एक लाख कंत्राटी पद्धतीवर १५ हजार

मुंबई : राज्यातील वीज कमतरता दूर व्हावी म्हणून पॉवर स्टेशन बांधून सरकारचा महानिर्मिती विभाग आपली भूमिका योग्य प्रकारे पार पाडत असताना, ज्या पॉवर स्टेशन साठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या ते शेतकरी १५ हजारावर महानिर्मिती विभागात कंत्राटी पद्धतीवर काम करत आहेत. मात्र महानिर्मिती काही कामगार कायम केले गेले त्यांना एक लाख पगार दिला जात आहे. या दुजभावाच्या वागणुकी विरोधात कंत्राटी कामगारांनी आझाद मैदानात कामगार नेते कृष्णा भोईर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केले आहे.

महानिर्मिती विभागाने २५०० कामगारांना कायम करतो म्हणून वेळोवेळी आश्वासन देऊन त्यांचे प्रश्न समस्या प्रलंबित ठेवल्या आहेत. तेच काम, कामाची वेळ तीच मग वेतनात फरक का ? धोरणात्मक निर्णय घेऊन जर सरकारने या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले तर या कंत्राटी कामगारांना एक लाख पगार मिळेल. रिक्त जागा भरल्या तर दिड हजार लोकांना रोजगार मिळेल असे कृष्ण भोईर यांनी सांगितले.

वंश व रंगाच्या आधारे आजही भेदभाव सुरूच

मुंबई : समाजामध्ये आजही वंश आणि रंगाच्या आधारे भेदभाव केला जातो. पाश्चिमात्य देशांमध्ये आजही काळे आणि गोरे यांच्यात भेदभाव केला जातो. आजही गोरे आणि काळ्यांना गोळ्या घालतात. असे अशी खंत ऑल इंडिया कॅम्पिंग ह्युमन डीग्रिटी या संघटने चे अध्यक्ष जियायुद्दिन सिद्दीकी यांनी मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

काही महिन्यांपासून देशात ठराविक धर्माच्या लोकांच्या घरावर बुलडोझरचा वापर होत आहे. आत्तापर्यंत देशात हजारो घरावर बुलडोझर फिरवला आहे. माणूस आपलं संपूर्ण आयुष्य घर बांधण्यासाठी घालवतो परंतु काही क्षणात तुम्ही त्यांचे घर तोडून टाकता हे योग्य नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

महिलांवर लैंगिक अत्याचार केले जात आहेत. महाराष्ट्रातील बदलापूर याठिकाणी लहान मुलींवर देखील अत्याचार केल्याचे आपण पाहिले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर वाहेदत ए इस्लामी या संस्थेच्या माध्यमातून ५ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान मानवता जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे.

ई - रिक्षांना परवाना सक्तीचा करण्याची जिल्हा टोरिक्षा संघर्ष समितीची मागणी

कोल्हापूर - ई - रिक्षांना परवाना सक्तीचा करावा, प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून बायोमेट्रीक हजेरी सुरु करण्यात यावी अशी मागणी कोल्हापूर जिल्हा टोरिक्षा संघर्ष समितीनं केलीय. या मागणीचं निवेदन त्यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिले

कोल्हापूर शहरात सहा हजाराहून अधिक परवानाधारक रिक्षा आहेत. त्यातच ई - रिक्षांची भर पडली आहे. या रिक्षांना कोणताही परवाना नाही. आता तर काही परवानाधारक रिक्षा चालक आपली रिक्षा भाड्यानं देवून आणि आपण स्वतः ई - रिक्षा चालवून दुहेरी उत्पन्न मिळवत आहेत. त्यामुळं परवानाधारक रिक्षा चालकांचं आर्थिक नुकसान होवू लागलय. त्यामुळं कोल्हापूर जिल्हा टोरिक्षा संघर्ष समितीनं ई - रिक्षांना परवाना सक्तीचा करावा या मागणीसाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांची भेट घेतली आणि त्यांच्यासमोर रिक्षा चालकांच्या समस्या मांडल्या.

कार्यालयीन कर्मचाऱ्यांना ओळखपत्र सक्तीचं करावं , चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश सक्तीचे करावेत या मागण्यांचं निवेदन यावेळी शिष्टमंडळानं दिलं . या शिष्टमंडळात कॉम्रेट सुभाष शेटे ,राजेंद्र जाधव ,चंद्रकांत भोसले, ईश्वर चन्नी ,अरुण घोरपडे ,मोहन बागडी ,अविनाश दिंडे, राहुल पोवार ,राकेश गायकवाड ,अतुल पोवार, शिवाजी पाटील सहभागी झाले होते

काळा शिक्षकदिन' म्हणून शिक्षकदिन साजरा करत शिक्षकांनी केले रास्तारोको आंदोलन

कोल्हापूर : अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा संच मान्यता २०२३ - २४ नुसार एक जून २०२४ पासून वाढीव टप्पा अनुदान आदेश काढावा. १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा जाचक आदेश रद्द करावा. या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समिती, कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठ व इतर शिक्षक संघटनांनी आजचा शिक्षकदिन 'काळा शिक्षकदिन' म्हणून साजरा करत दसरा चौकात तोंडाला काळी पट्टी बांधून रास्ता रोको आंदोलन केलं.

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समिती यांच्या वतीनं राज्यभर शिक्षक उपसंचालक कार्यालया समोर मागील ३४ दिवसापासून आंदोलन करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे महिला अध्यक्ष नेहा भोसरी, संदीप भोरे, रेश्मा सनदी या चौघांचं मागील दहा दिवसापासून शिक्षक उपसंचालक कार्यालयात आमरण उपोषण सुरू होतं. त्यांची प्रकृती खालावत चालल्यानं सर्व शिक्षक संघटनांनी आंदोलन आणखीन तीव्र करण्यासाठी आज एकत्र येत शिक्षक आमदार जयंत आसगावकर, शिक्षक नेते एस.डी. लाड यांच्या नेतृत्वाखाली हा रास्ता रोको केला. सर्व शिक्षक, शिक्षक संघटने उपोषणकर्ते खंडेराव

जगदाळे यांच्यासह चारही जणांना अन्नत्याग आंदोलन माग घेण्याची विनंती केली. या विनंतीस मान देऊन या चौघांनी सोनाक्षी पाटील या चिमुकलीच्या हस्ते अन्नग्रहण केलं. यावेळी शिक्षक आमदार जयंत तासगावकर, मराठवाडा येथील शिक्षक प्रतिनिधी आनंदा करडे, सोनाक्षी पाटील, खंडेराव जगदाळे यांनी मनोगत व्यक्त केली. यावेळी खासदार धैर्यशील माने यांनी आपला प्रतिनिधी पाठवून आठ - नऊ तारखे पर्यंत प्रश्न मार्ग लावू असं आश्वासन दिलं. मात्र याआधी सुद्धा अनेकवेळा अशी आश्वासन मिळाल्यानं, बोलाचा बात आणि बोलाची कडी असं

महाराष्ट्राचा स्वाभिमान मोदीकडे गहाण ठेवू नका

राज्यात मविआचे सरकार आणाः मल्लिकार्जुन खरगे

मुंबई : महाराष्ट्रातील महाविकास आघाडी मजबूत आहे, त्याला कोणीही हलवू शकत नाही. तीन पक्ष मिळून चांगले काम करत आहोत. राहुल गांधी यांनी 'डरो मत'चा संदेश दिला आहे, न घाबरता काम करा. भाजपा युती सरकार गुजरातच्या इशा-यावर काम करत आहे. महाराष्ट्राचा स्वाभिमानी मोदींकडे गहाण ठेवू नका. लोकसभेप्रमाणेच भरघोस पाठिंबा देत विधानसभेला मविआचे सरकार आणा, असे आवाहन करून महाराष्ट्रात मविआचे सरकार आले की केंद्रातील मोदी सरकारही जाईल, असे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे म्हणाले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या 'लोकतीर्थ' या स्मारकाचे लोकार्पण व पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाचा कार्यक्रम सांगली जिल्ह्यातील वांगी येथे झाला, या कार्यक्रमात खरगे बोलत होते. खरगे पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आदर्श, प्रेरणास्रोत आहेत पण नरेंद्र मोदींचा हात त्यांच्या पुतळ्याला लागताच पुतळा कोसळला. मोदींनी गुजरातमध्ये पुलाचे उद्घाटन केले तो पडला, अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन केले, त्याला गळती लागली. नरेंद्र मोदी हे मतांसाठी दिखाव्याचे काम करतात. घाईघाईत पुतळा बनवल्याने तो कोसळला व महाराष्ट्राचा आणि देशाचा अपमान झाला.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यावेळी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची माफी मागितली पण ही माफी त्यांनी पुतळ्याचे काम आरएसएसच्या व्यक्तीला दिले, त्यात भ्रष्टाचार झाला म्हणून माफी मागितली का? असा सवाल विचारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या प्रत्येक व्यक्तीची माफी मागितली पाहिजे असे म्हणाले. शेतकरी आंदोलनात ७०० शेतकरी शहीद झाले, नोटबंदीमुळे लघु, छोटे, मध्यम उद्योग संपवले व लाखो लोकांचे रोजगार घालवले, चुकीच्या पद्धतीने जीएसटी लावला त्याबद्दलही माफी मागा, असे राहुल गांधी म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यावेळी म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचे महत्व ओळखून गावोगावी शैक्षणिक संस्था उभा करून सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षणाची दारे उघडली, त्या कर्मवीर भाऊराव पाटलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यातील अनेक भागात शिक्षण

संस्था सुरु केल्या. शिक्षणाबरोबर दुष्काळी भाग अशी ओळख असलेल्या पलुस कडेगाव भागाचा कायापालटही पंतगराव कदम यांनी केला आहे, असे पवार म्हणाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले म्हणाले की, पतंगराव कदम हे सर्वसामान्यांसाठी प्रेरणास्थान आहेत, सामान्य कुटुंबात जन्माला आलेले पतंगराव कदम स्वकर्तृत्वाने मोठे झाले. पलूस कडेगाव भागात त्यांनी आरोग्य, शिक्षण, कृषी क्षेत्रात विविध कामे करून या भागाचा विकास केला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम यांनी केले. या कार्यक्रमाला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सरचिटणीस खा. प्रणिती शिंदे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, आ. विक्रम सावंत, सांगली शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील आदी उपस्थित होते.